

## श्री गणेश आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची ।।

जय देव जय देव जय मंगल मूर्ती ।
दर्शनमात्रे मन कामनापुर्ती ।।जय देव

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची ऊटी कुंकुम केशरा ।
हीरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।।जय देव

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुण्ड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे
सुरवरवंदना ।।जय देव

---

## श्री शंकर आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।
लावण्य सुन्दर मस्तकी वाळा ।
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ।।जय देव
जय देव जय देव जय श्री शंकरा ।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा ।।जय देव
कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा ।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।।जय देव
देवी दैत्य सागर मंथन पै केले ।
त्यामाजी अवचीत हलहल जे उठले ।
ते त्वा असुरपणे प्राशन केले ।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ।।जय देव
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी ।
रघुकुळटीळक रामदासा अंतरी ।।जय देव

### श्री दुर्गा आरती

दुर्गे दुर्घटभारी तुजवीण संसारी ।
अनाथ नाथे अम्बे करुणाविस्तारी ।
वारी वारी जन्म मरणांते वारी ।
हारी पडलो आता संकट नेवारी ।।१।।
जय देवी जय देवी महिषासुरमथिनि ।
सुरवर ईश्वर वरदे तारकसंजीवनी ।।धृ।।
तुजवीण भुवनी पाहता तुज ऐसे नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही ।
साही विवाद करिता पडले प्रवाही ।
ते तू भक्तालागी पावसि लवलाही ।।२।।
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासा ।
क्लेशांपासुनी सोडवी तोडी भवपाशा ।
अम्बे तुजवाचून कोण पुरवील आशा ।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ।।३।।

### श्री विठ्ठल आरती

युगे अठ्ठावीस विटेवरी ऊभा ।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा ।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा ।  पावे जिवलगा ।।जय देव
तुळसी माळा गळा कर ठेवुनी कटी ।
कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनूमंत पुढे उभे राहती  ।।जय देव
धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाइ राणीया सकळा ।
ओवाळू आरत्या विठोबा सावळा ।।जय देव
ओवाळू आरत्या कुरवंड्या येती ।
चंद्रभागेमध्ये सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।।जय देव
आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमध्ये स्नान जे करती ।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ।।जय देव

### श्री दत्त आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगे समाधी न ये ध्यान ।।
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता ।
आरति ओवाळीता हरली भवचिन्ता ।।जय देव
सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।
अभाग्यासी कैसी नकळे ही मात ।
पराही परतली कैसा हा हेत ।
जन्म मरणाचा पुरलासे अंत ।।जय देव
दत्त येऊनीया उभा ठाकला ।
साष्टांगे नमने प्रणिपात केला ।
प्रसन्न होउनीया आशीर्वाद दिधला ।
जन्मा मरणाचा फेरा वाचविला ।।जय देव
दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।
हरपले मन झले उन्मन ।
मी तू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्री दत्त ध्यान ।।जय देव

### श्री ज्ञानेश्वर आरती

आरती ज्ञानराजा महाकैवल्य तेजा
सेविती साधुसन्त मनू वेधला माझा ।।१।।आरती

लोपले ज्ञान जगी, हित नेणती कोणी,
अवतार पांदुरंग, नाम ठेवीले ज्ञनी ।।२।।आरती

कनकाचे ताट करी, उभ्या गोपिका नारी,
नारद तुम्बरहू, साम गायन करी ।।३।।आरति

प्रकट गुह्य बोले, विश्व ब्रह्मची केले,
रामा जनार्दनी, पायी टकची ठेले ।।४।।आरति

### आरती

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।
त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुः सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करोमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।
अच्युतं केशवं राम नारायणम् ।
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम् ।
जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।
।।मंगलमुर्ती मोरया।।
।।गणपतिबाप्पा मोरया।।

### गणपति श्लोक

ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे ।
कविं कविनां उपमश्रवस्तमम् ।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आनः ।
शृण्वन् ऊतिभिः सीद्सादनम् ।।

### मंत्र पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ।।
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने ।
नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् काम कामाय मह्यं ।
कामेश्वरो वैश्रवणो ददातु कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ।
ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं
वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं
समंतपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुष आं
तादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकेराळिति ।
तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो
मरुतस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।
एकदंतायविद्महे वक्रतुण्डाय धीमहि ।
तन्नोदंती प्रचोदयात् ।
।।मंत्रपुष्पांजली समर्पयामि।।
।।गणपतिबाप्पा मोरया ।।

--------o--------

Send corrections to sanskrit@cheerful.com